दिनांक- ०६/०५/२०२५

## - : प्रेस नोट :-

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
गुन्हा नोंद क्र. २९/२०१४, कलम- ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र.अधिनियम १९८८
विशेष खटला क्र. ९१/२०१४

आरोपी - १) श्री. राजेंद्र एकनाथ नेरकर, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी(प), मुंबई
२) श्री. जयप्रकाश मोरेश्वर दळवी, खाजगी इसम
यांनी लाच स्विकारल्या प्रकरणी आरोपी क्र. १ यास ४ वर्षे कारावास व रू. ५०,०००/- द्रव्यदंडाची शिक्षा तसेच आरोपी क्र. २ यास ३ वर्षे कारावास व रू. १०,०००/- द्रव्यदंडाची शिक्षा

यातील आरोपी लोकसेवक क्र. १ यांनी लोकसेवक पदाच्या नात्याने काम करतांना फिर्यादी यांचे बसचे कागदपत्र परत देण्याकरीता रू. १५००/- लाचेची मागणी करून सापळा कारवाई दरम्यान सदरहू लाचेची रक्कम यातील आरोपी क्र. २ यांचेमार्फतीने कायदेशीर परिश्रमाखेरीज पारितोषन म्हणून स्विकारली म्हणून ला.प्र.वि., मुंबई विभागाकडुन गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करून मा. विशेष सत्र न्यायालयात उपरोक्त नमूद आरोपी यांचेविरूध्द विशेष खटला क्र. ९१/२०१४ अन्वये दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते. सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष सत्र न्यायालय, कोर्ट क्र. ४६ येथे झाली असता, सुनावणी अंती लोकसेवक आरोपी यांचेविरूध्द आरोप सबळ पुराव्यानिशी सिध्द झाल्याने दिनांक ०६/०५/२०२५ रोजी मा. न्यायालयाने आरोपी क्र. १ यास ४ वर्षे कारावास व रू. ५०,०००/- द्रव्यदंडाची शिक्षा तसेच आरोपी क्र. २ यास ३ वर्षे कारावास व रू. १०,०००/- द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. मुकुंद हातोटे व श्री. इरफान गुलाम शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी केला. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. प्रभाकर तरंगे यांनी काम पाहिले.

अपर पोलीस उप आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई सत्यमेव जयते

( अनिल घेरडीकर )
अपर पोलीस उप आयुक्त (१),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :- acbmaharashtra.gov.in,
**ईमेल** :- acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :- www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :- www.acbmaharashtra.net